प्रेस नोट दिनांक २२/०३/२०१९

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## घरफोडीकरणारा आरोपी गजाआड

दि.१७/०३/२०१९ रोजी ३.३० वा. घरफोडी रोखण्याच्या अनुषंगाने पोलीस उप निरीक्षक श्री अभिजित चौगुले हे स्टाफसह विश्रांतवाडी वन मोबाईलमधून पेट्रोलिंगकरत असताना विश्रांतवाडी चौकातून एअरपोर्ट रोडने जात असताना चैतन्य हॉस्पिटल समोर एक इसम सायकल वरून जाताना दिसला. पो. शि. ८८६८ मोरे यांनी त्यास हटकले असता त्याने सायकल जोरात पळविली. आम्हाला त्याचा संशय आल्याने विश्रांतवाडी वन मोबाईल वरील चालक पो शि ७५९८ सुजित सोनवणे यांना गाडी वेगाने चालवण्यास सांगून संशयित इसमास अडवण्यास सांगितले. एअरपोर्ट रोडवरील सृष्टी हॉटेलजवळ सायकल स्वारास थांबविले असता सदरचा संशयित हा विश्रांतवाडी पोलीस स्टेशनकडील रेकॉर्डवरील आरोपी असल्याचे पो शि ७३३२ किशोर दुशिंग यांनी ओळखून सदरचा संशयित इसम हा रोहित नानाभाऊ लंके रा. कस्तुरबा हौसिंग सोसायटी, सनबीम शाळेच्या पाठीमागे, विश्रांतवाडी असे असल्याचे सांगितले. सदरचा इसम हा रेकॉर्डवरील असल्याने आणि पोलीसांना पाहून तो पळून जात असल्याने आम्हाला त्याचा संशय आल्याने त्याचे कडे असणाया सायकल विषयी विचारणा केली असता त्याने समाधान कारक उत्तर दिले नाही. रेकॉर्डवरील आरोपी रात्रीच्या वेळी संशयित पणे फिरत असल्यामुळे त्याची अंगझडती घ्यावयाची असल्याने पोना ३८६४ भालचिम यांना दोन पंचांना बोलाविण्यास सांगून ते हजर झाले वरून त्यांना थोडक्यात हकिकत सांगून पंचां समक्ष रोहित नानाभाऊ लंके रा. कस्तुरबा हौसिंग सोसायटी, सनबीम शाळेच्या पाठीमागे, विश्रांतवाडी याची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कर्णफुले सोने व ३ ग्रॅम वजनाची एक सोन्याची अंगठी, एक सायकल व लाल रंगाची मुठ असलेले कटर, पोपट पाना व स्क्रुडायव्हर असे एकुण २१,१२०/- रुपये किंमतीचा माल मिळून आल्याने त्याचे विरुध्द विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गु र क्र ९१/२०१९ भा द वि कलम ४५७,३८०, गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे वपोनि अरुण आव्हाड यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक प्रमुख पोउनि अभिजित चौगुले, पोहवा ५४१५ राजपुत, पोना विनायक रामाणे, पोना यशवंत किर्वे, पोना प्रविण भालचिम,पोशि सुजित सोनवणे, पोशि मंगेश मोरे पोशि़ रिहान पठाण, पोशि किशोर दुशिंग, पोशि प्रफुल्ल मोरे, पोशि अनिकेत भिंगारे यांनी पार पाडली.